# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{क्रीडा व सांस्कृतिक विभाग}**

नागपूर महानगरपालिका तथा महाप्रज्ञा बुद्ध विहार, महाल, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुर्व संध्येला दि. १३.०४.२०२५ रोजी प्रभाग क्र. १८ येथील गाडीखाना मैदानावर मराठी फिल्म सिटीतील संगीतकार श्री. आदर्श शिंदे यांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित आहे. या कार्यक्रमाकरीता श्री. आदर्श शिंदे यांना मानधन रु. २६ लक्ष "जी सिस्टीम" इव्हेंट कंपनी यांनी आरक्षित केल्याप्रमाणे या संस्थेला भुगतान करावयाचे आहे तथा ध्वनी व एल.ई.डी. व्यवस्था रु. ४ लक्ष म.न.पा. तर्फे करण्यात येणार आहे. असे एकूण रु. ३० लक्ष म.न.पा. फंडातुन होणार आहे. हा खर्च पद क्रमांक A २६५०१३४२२०४ अंतर्गत करण्यात येईल.

करीता, रु. ३० लक्ष राशीच्या प्रस्तावा स मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

**<u>टिप</u> :-**

१. सदर प्रस्तावास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजुरी प्राप्त आहे.
२. विस्तृत टिपणी संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 16/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 09/04/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, क्रीडा व सांस्कृतिक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका तथा महाप्रज्ञा बुद्ध विहार, महाल, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुर्व संध्येला दि. १३.०४.२०२५ रोजी प्रभाग क्र. १८ येथील गाडीखाना मैदानावर मराठी फिल्म सिटीतील संगीतकार श्री. आदर्श शिंदे यांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित आहे. या कार्यक्रमाकरीता श्री. आदर्श शिंदे यांना मानधन रु. २६ लक्ष "जी सिस्टीम" इव्हेंट कंपनी यांनी आरक्षित केल्याप्रमाणे या संस्थेला भुगतान करावयाचे आहे तथा ध्वनी व एल.ई.डी. व्यवस्था रु. ४ लक्ष म.न.पा. तर्फे करण्यात येणार आहे. असे एकूण रु. ३० लक्ष म.न.पा. फंडातुन होणार आहे. हा खर्च पद क्रमांक A२६५०१३४२२०४ अंतर्गत करण्यात येईल.

करीता रु. ३० लक्ष राशीला प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.